# ई - पोलीस पत्रिका

*दि  १९/०१/२०२१*  *अनु.क्र. १३*

## *(अमरावती शहर पोलीसांची २०२० ची उद्दिष्टे)*

- *जागरूक व तत्पर पोलीस.*
- *नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.*
- *उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.*
- *महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.*
- *जातीय सलोखा वाढविणे.*
- *संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.*
- *रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.*
- *पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.*
- *आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.*
- *"सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू*

# भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

**१.जा.क्र.पोआअ/पशा-१/साळी -बदली हजर/२१२/२०२१/ अमरावती शहर दिनांक ०१/०१/२०२१**

**आदेश**

महाराष्ट्र शासन गृह विभाग,रापोसे -१७२०/प्र.क्र.११३/पोल-१ (अ) दिनांक २८/१०/२०२१ अन्वये राज्य पोलीस सेवेतील पोलीस उपायुक्त (असंवर्ग) या संर्वगातील खालील नमुद अधिकारी यांची बदलीने पदस्थापणा करण्यात आल्याने ते अमरावती शहर या घटकात त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०७/०१/२०२१ चे मा.नंतर कर्तव्यावर हजर झाले आहेत .सदर पोलीस उपायुक्त यांना अमरावती शहर या घटकातील पोलीस उपायुक्त या रिक्त पदावर कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे.

| अ.क्र. | आदेशातील अ.क्र. | पोलीस उपायुक्त यांचे नाव | यापूर्वीची पदस्थापना | बदलीनंतरची पदस्थापना | अमरावती शहर या घटकात हजर झाल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **१८** | **श्री विक्रम महादेव साळी** | **पोलीस उपायुक्त, वाहतुक ,नागपुर शहर** | **पोलीस उपायुक्त, अमरावती शहर** | **दि.०७/०१/२००१** |

**२.क्रमांक:पोआअ/लेखा शाखा/पोकनि/कर्जमंजुरी/३६७/२०२१ अमरावती शहर दि. १७/०१/२०२१**

**विषय :-** पोलीस कल्याण निधीमधुन रु. १५,०००/- कर्ज मंजुरीबाबत.

**आदेश**

महाराष्ट्र पोलीस कल्याण नियमावली २०२० मधील चे नियम क्रमांक .१२.मधील अ.क्र.२ (अ.व.ब.) तसेच अ.क्र.३ नुसार खालील नमुद पोलीस अधिकारी /कर्मचारी तसेच मंत्रालयीन अधिकारी/ कर्मचारी यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेप्रमाणे खालील अटी व शर्ती च्या अधिन राहुन पोलीस कल्याण निधीमधुन वैदयकिय कर्ज मंजुर करणेत येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अधि/कर्म यांचे नाव | नेमणुक | मंजुर अग्रीम | वसुली हप्ता | कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | वश्रेलि.सुवर्धा वडनेरकर | पत्रव्यवहार शाखा अम.शहर | १५,०००/- | १५०००/- प्रतिमाह १० हप्त्यात | स्वतःचे औषधोपचार कामे |

**३.क्रमांक:पोआअ/लेखा/पोकनि/कोरोना( कोविड-१९)/१९५/२०२१ अमरावती शहर दि. ०७/०१/२०२१**

**विषर्य :-** पोलीस कल्याण निधीमधुन कोरोना संसर्ग झालेले पोलीस कर्मचारी यांना प्रत्येकी १,००,०००/- अग्रीम मंजुरीबाबत.

पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस कर्मचारी यांना कोविड -१९ या विषाधूचा संसर्ग झालेला आहे .मा.पोलीस महासंचालक यांचे पत्र क्र.पोमस/२८ अे/४९३७/कोराणा विषाणू/५०/२०२० मुंबई २०.०४.२०२० अन्वये , यांना एकुण रकम रुपये ६०,०००/ अक्षरी साठ हजार फक्त पोलीस कल्याण निधीमधुन अग्रीम मंजुर करण्यात येत आहे.

| **अ.क्र** | **पोलीस अधि/कर्म यांचे नाव** | **नेमणुक** | **मंजुर रक्कम** | **हप्ते** |
|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि/३२२ पुरुषोत्तम बारड | पो.मुख्यालयअम.शहर | ३०,०००/- | ३०००X१० |
| २ | पोना/३१० राजेश खेलवाडे | ए.टी.एस.अम.शहर | ३०,०००/- | ३०००X१० |
| | **अक्षरी साठ हजार रुपये** | | **६०,०००/-** | |

**४.क्र.पोआअ/विचौ-२/कसुरी/अंतिम आदेश/पोउपनि-ठाकरे/२२६/२०२१ अमरावती शहर दि. ०८/०१/२०२१**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे कारणे दाखवा नोटीस क्रमांक पोआअ/विचौ-१/कसुरी/का.दा.नो/पीएसआय ठाकरे/५६४५/ २०२० अमरावती शहर, दिनांक ०१/१०/२०२०

**कसुरदारचे नाव :-** पोउपनि श्री पुरुषोत्तम ठाकरे, पोलीस स्टेशन नागपुरी गेट, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोउपनि श्री पुरुषोत्तम ठाकरे, नेमणुक नागपुरी गेट, अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन आपणाकडे अप क्रं. १८०/२०२० कलम ३०२ भादवि चा गुन्हा तपासाकरीता दिला होता. तुम्ही तपासी अधिकारी म्हणुन दोषारोपपत्र दिनांक १८/०८/२०२० पर्यत वि न्यायालयात दाखल करणे अनिवार्य होते. तुम्ही तसे न करता ९० दिवसांमध्ये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल न केल्याने आरोपीला दिनांक १९/०८/२०२० रोजी विद्यमान कोर्ट क्रं. ३ रे न्यायदंडाधिकारी यांनी आरोपी क्रं ०१ यांना जमानतीवर सोडले. त्याबाबत वि. न्यायालयाने तुम्हांस खुलासा मांगितला असता तुम्ही सादर केलेला खुलासा समाधानकारक दिसुन आला नाही. अशा आशयाचे पत्र सहाय्यक सरकारी अभियोक्ता न्यायालय क्रं. ०३ अमरावती जा.क्रं. २४/२० दिनांक २१/०१/२०२० रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रामध्ये नमुद केले आहे की, दोषारोपपत्र ९० दिवसामंध्ये दाखल न केल्यामुळे त्यांच्या या निष्काळजीपणामुळेच आरोपी क्रं. १ याला जमानत मिळाली असा निर्णय विद्यमान न्यायालयाने पारीत केला. आपल्या या हलगर्जीपणामुळे व बेजबाबदारपणा मुळे या कसुराबाबत अंत्यत अशा महत्वाच्या गुन्हयातील खुनाचा आरोपीला जामीन मिळाली. तुमच्या या वर्तनामुळे शिस्तबध्द पोलीस खात्याची प्रतिमा न्यायालयासमोर मलीन झाली.

अशाप्रकारे आपण शिस्तबध्द पोलीस खात्यात नेमणुकीस असुन सुध्दा आपल्या कर्तव्याप्रती बेशिस्तपणा केल्याचे निदर्शनास आले आहे. या आपल्या बेशिस्तपणाच्या व बेजबाबदारपणाच्या कसुरीबदल आपणास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६

नियम क्रमांक ३ पोटनियम (२) (५) चे तरतुदी नुसार देय वार्षीक वेतन वाढ (एक) १ वर्षाकरीता का रोखण्यात येवु नये म्हणुन करणे दाखवा नोटीस देण्यात आली होती व सदर नोटीस तुम्ही स्विकारली असुन त्यावर तुमचे स्पष्टीकरण सादर केलेले आहे. परंतु आपणास पुढील कर्तव्यात कामामध्ये सुधारणा करण्याची एक संधी देण्यात येवुन प्रस्तावित कारणे दाखवा नोटीसमध्ये देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये अंशत बदल करुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>अंतिम आदेश</u>**

वर नमुद कसुरदार यांना उपरोक्त कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ चे नियम क्रमांक ३ मधील उप- नियम (२) मधील (ii) चे तरतुदी नुसार **<u>"सक्त ताकीद"</u>** ही शिक्षा देण्यात येत आहे.

**५.क्रमांक पो.आ.अ/विचौ.-१/निलंबन/कसुरी/पोहवा-गडलींग/२०२१/३६३/ अमररावती शहर दि.१४/०१/२०२१**

## *<u>निलंबन आदेश</u>*

आपण पोहवा/१७६५अंबादास वसंतराव गडलींग नेमणुक पो.स्टे. राजापेठ अमरावती शहर येथे नेमणुकीस असुन आपली दि.४/०१/२०२१ते १०/०१/२०२१ पावेतो १४,१६ ते २० दरम्यान डियुटी असतांना दि. ४/०१/२०२१ रोजी बीट मार्शल, दामिनी मार्शल, सि.आर. पेट्रोलींग व दामीनी पोट्रोलींग वाहन लोकेशन आठवडा चेकींग, नाकाबंदी दरम्यान पो.उप.नि. अभ्यंकर अर्ज शाखा यांनी १२.४० वा राजापेठ सि.आर.१ क्राती नगर येथे चेक केली असता त्या मध्ये तुम्ही गैरहरज मीळुन आले तसेच दि. ०६/०१/२०२१ पो.नि. निलीमा आरज विशेष शाखा यांनी ११.४० वा नवाते चौक नाकाबंदी पॉईट चेक केला असता गैरहजर मिळुन आले आहे.

अशा प्रकारे तुम्ही अतीमहत्वाच्या अमरावती जिल्हयातील ग्रामपंचातीच्या सार्वत्रिक निवडणुका असतांना कर्तव्याचे भान न ठेवता महत्वाचा बदोबंस्त असतांना कर्तव्यावर पोलीस खात्याचे संपुर्ण ज्ञान असतांना सुध्दा कर्तव्यवर अनाधीकृत गैरहजर राहुन पोलीस खात्याला न शोभणारी गैरवर्तन करुन गंभीर कसुरी केली आहे. सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असुन शिस्तप्रिय पोलीस खात्यास अशोभनिय आहे.

**तुमच्या उपरोक्त कर्तव्यावरील गैरवर्तनाचे कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा जनसामान्य मानसात मलीन झाली आहे. म्हाणुन आम्ही आपणास महाराष्ट्र मुंबई पोलीस कायदा १९५१ मधील नियम २५ मधील १ (ख) आणि मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपील) १९५६ नियम ३ (१) (अ-२) (१-अ) (अ) च्या तरतुदीनुसार तसेच निभागीय चौकशी नियम पुस्तिका १९९१ मधील प्रकरण दोन मधील नियम २.२ (अ) च्या तरतुदी नुसार <u>आदेशाच्या दिनांकापासुन शासन सेवेतुन निलंबित करण्यात येत आहे.</u>**

**महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहणअवधी, स्वियेत्तर सेवा आधि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे नियम ६८ नुसार निलंबनाच्या आदेश अस्तित्वात असे पर्यत तीन महाने पावेतो त्यांना अर्धपगारी वेतना इतका उदरनिर्वाह भत्ता व त्यावर मिळणारे दरमहा इतर भत्ते अनुज्ञेय राहतील.तसेच निलंबनात ३ महिण्याचा कालावधी पुर्ण झाल्यावर त्यांनी खाजगी नोकरी अथवा उद्योग धंदा केला नसल्याबाबतचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केल्यानंतर त्यांचा निर्वाह भत्ता वाढवुन देण्याबाबत विचार करण्यात येईल.**

# वाढदिवसाच्या हार्दीक शुभेच्छा

**सर्व पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नांव पोलीस स्टेशनचे नोटीस बोर्डवर लिहुन हार्दीक शुभेच्छा द्याव्यात.**

| **अ.क्र.** | **हुददा** | **ब.न.** | **अधि.व कर्म.यांचे नांव** | **नेमणुक पो.स्टे** | **वाढदिवसाचा दिनांक** |
|---|---|---|---|---|---|
| १ | पोहवा | ५७५ | दिनेश म्हाला | पोलीस मुख्यालय | १९/०१/२०२१ |
| २ | पोहवा | १५२० | मणिष करपे | शवाशा पर्व | १९/०१/२०२१ |

**(अशोक लांडे)**
प्र.सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त,अमरावती शहर करिता

प्रत,

पत्रव्यवहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक ,आस्थापना शाखा/सीसीटीएनएस कक्ष यांना माहीती व आवश्यक कार्यवाही करीता.